// २३ //

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | १६ | ०४ | २०२४ |
| नोंदणी तारीख | : | १६ | ०४ | २०२४ |
| निकाल तारीख | : | ०८ | ०५ | २०२६ |
| कालावधी | : | व | म | दि |
| | | ०२ | ०० | २२ |

## भाग १

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय, मालवण, जि. सिंधुदुर्ग**<br>(पीठासीन अधिकारी श्री.एम.के.फकीह )<br>(अधिघोषित दिनांक ०८/०५/२०२६)<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७७/२०२४**<br>**सी.एन.आर.क्र.एमएचएसआय ०७०००१८१२०२४**<br>**निशाणी क्र.६ लगत** |
| | प्रथम खबर अहवाल गुन्हा क्रमांक — ४४/२०२३<br>पोलीस स्टेशन – आचरा पोलीस स्टेशन |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे ठाणे प्रमुख<br>आचरा पोलीस स्टेशन, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग |
| सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्री. श्री.टी.ए.भणगे/श्रीमती यु.आर.जाधव |
| आरोपी | राजेश दशरथ वाळवे,<br>वय –३७ वर्षे, धंदा– नोकरी,<br>रा. वॉटर पोलीस लाईन, रुम नं. बी–१, बी ब्लॉक,<br>वंजु कोटक मार्ग प्रोटेक्शन मुंबई फोर्ट नं.१.<br>मुळ रा.कुडोपी मधलीवाडी ता. मालवण. |
| आरोपीतर्फे वकील | श्री.यु.बी.कुळकर्णी |

# भाग २

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २९/०९/२०२३ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | ३०/०९/२०२३ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १४/०५/२०२६ |
| गुन्ह्याचा संक्षेप नोंदवल्याची तारीख | २१/०६/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०२/०९/२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवण्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णय तारीख | ०८/०५/२०२६ |
| शिक्षा सुनवल्याची तारीख, असल्यास | निरंक |

## आरोपीची माहीती

| क्रमांक | आरोपीचे नाव | आरोपीच्या अटकेची तारीख | आरोपीची जामीनावर मुक्तता झाल्याची तारीख | आरोपी विरुध्द निश्चीत करण्यात आलेले गुन्हे | आरोपीची निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरवण्यात आले | आरोपीस सुनवण्या आलेली शिक्षा | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार संपपरिक्षेच्या कालावधी मध्ये आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुनिल मोहनराव सुर्यवंशी | निरंक | निरंक | भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम कलम १८४, | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

# भाग ३

## अ) अभियोग पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | गुरुनाथ भाऊ घाडी | फिर्यादी |

| | | |
|---|---|---|
| २. | श्रेयश विठ्ठल घाडी | घटनास्थळ |
| ३. | संतोष बाबुराव घाडी | साक्षीदार |
| ४. | राहूल गुरुनाथ घाडी | प्रत्यक्षदर्शी जखमी साक्षीदार |
| ५. | सुशांत विष्णू पुरळकर | तपासिक अंमलदार |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास**

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास**

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | पी१/पी.डब्ल्यू १ | फिर्याद |
| २. | पी२/पी.डब्ल्यू ५ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | नि.क्र.२६ व २७ | जखमींची वैद्यकिय प्रमाणपत्रे (बचावपक्षाने मान्य केले) |

**ब) बचाव पक्ष**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन निशाणी**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड) मुद्देमाल तपशील

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

# न्या य नि र्ण य

सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.यु.आर.जाधव व बचाव पक्षाचे विधीज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे निर्णयास्तव उपस्थित झालेले असून मी त्यावरील निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, बुधवळे ते चिंदर रस्त्यावर कुडोपी मधलीवाडी येथे आरोपीने त्याचे ताब्यातील मोटरसायकल क्र. एमएच–०४–जीएल–५५७२ ही हयगईने व निष्काळजीपणे चालवून मानवी जिवीतास व सुरक्षिततेस धोका उत्पन्न करुन भारतीय दंड विधान **कलम २७९** अन्वये गुन्हा केलेला आहे ? | : | नकारार्थी. |
| २. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, आरोपीने वरील वाहन हयगईने व निष्काळजीपणे चालवून मानवी जिवीतास धोका उत्पन्न करुन स्वत:स व दत्ता श्रीधर वाळवे यांना साध्या स्वरुपाची दुखापत करुन भारतीय दंड विधान **कलम ३३७** अन्वये गुन्हा केलेला आहे ? | : | नकारार्थी. |
| ३. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वरील नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने वरील वाहन हयगईने व निष्काळजीपणे चालवून मानवी जिवीतास धोका उत्पन्न करुन गुरुनाथ भाऊ घाडी व राहूल गुरुनाथ घाडी यांना गंभीर स्वरुपाची दुखापत करुन भारतीय दंड विधान **कलम ३३८** अन्वये गुन्हा केलेला आहे ? | : | नकारार्थी. |
| ४. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, आरोपीने वरील वाहन अतिवेगाने व धोकादायक पध्दतीने चालवून | : | नकारार्थी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | तेथील लोकांसाठी धोका उत्पन्न करुन **कलम १८४** मोटार वाहन अधिनियम अन्वये गुन्हा केलेला आहे ? | | |
| ५. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, आरोपीने वरील वाहन विमा संरक्षीत न करता चालविली म्हणून तुम्ही मोटरवाहन कायदा **कलम १९६** चे उल्लंघन करुन मोटर वाहन कायदा **कलम १४६** अन्वये गुन्हा केलेला आहे ? | : | नकारार्थी. |
| ६. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, आरोपीने वरील वाहनाचे वायु प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र न घेता सदरचे वाहन चालवून मोटरवाहन कायदा **कलम १९०(२)** अन्वये गुन्हा केलेला आहे ? | : | नकारार्थी. |
| ७. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत –</u>

२. मुद्दा क्र.१ ते ४ संलग्नीत असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दा क्र.१ ते ४ एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतले जात आहे. सा.क्र.१ गुरुनाथ यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. २९/०९/२०२३ रोजी ते व त्यांचा मुलगा राहूल हा त्यांचे सासरे बाबुराव घाडी यांच्या घरी म्हाळ असल्याने आले होते. के दोघेजण कार्यक्रम आटोपून नारिंग्रे येथे घरी जात असताना कुडोपी मधलीवाडी व खालचीवाडीमध्ये गणपती मंदिराजवळ आचऱ्याकडून बुधवळयाकडे आरोपी जात असताना त्याने त्यांच्या गाडीला धडक दिली. त्यामुळे त्यांना व त्यांच्या मुलाला डाव्या बाजूच्या चेहऱ्याला व डाव्या खांद्याला दुखापत झाली होती. त्यांना उपचारासाठी कणकवली येथील पोकळे हॉस्पीटलमध्ये नेले, त्या ठिकाणी पोलीसांनी त्यांचा <u>नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१</u> प्रमाणे फिर्याद दिल्याचे सांगितले आहे.

३. सा.क्र.२ श्रेयश यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. ०२/१०/२०२३ रोजी पोलीसांनी त्यांना चिंदर बुधवळे येथे अपघात झालेल्याठिकाणी पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. त्यांचेसमक्ष पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी करुन नकाशा व फोटो काढले होते. त्यांचे समक्ष नि.क्र.पी२/पीडब्ल्यू२ प्रमाणे घटनास्थळ पंचनामा तयार केल्याचे सांगितले आहे.

४. साक्षीदार क्र.३ संतोष यांने आपल्या पुराव्यात फिर्यादी व त्यांचा मुलगा राहूल हा त्यांचेकडे कार्यक्रमासाठी आले होते, ते कार्यक्रम आटोपून परत जाण्यास निघाल्यानंतर ५ ते १० मिनिटानंतर ते आचऱ्याला जाण्यासाठी निघाले असता एक ते दिड किलोमिटर अंतरावर त्यांचे भावोजी गुरुनाथ घाडी व भाचा राहूल घाडी हे रस्त्यावरती पडलेले दिसले. त्यांना गंभीर दुखापत झालेली होत्या आरोपीच्या मोटरसायलचा व त्यांच्या मोटरसायकलचा समोरासमोर अपघात झाल्यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाल्या असल्याचे तसेच त्यांनी पुढे घटनास्थळी जखमींशिवाय अन्य कोणही दिसले नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यांनी पुढे आपल्या पुराव्यात ते परत घरी जावून गणेश वाळवे यांची रिक्षा घेवून अपघातस्थळी येवून गुरुनाथ घाडी व राहूल घाडी यांना घेवून कणकवली येथील गेटवेल हॉस्पीटल येथे नेले असल्याचे सांगितले आहे.

५. सा.क्र.४ राहूल हा प्रत्यक्षदर्शी जखमी साक्षीदार आहे त्याने आपल्या पुराव्यात दि. २९/०९/२०२३ रोजी त्याचे वडीलांसोबत कुडोपी येथे मोटरसायकल क्र. एमएच–०७–वाय–१६२८ ने म्हाळासाठी गेले होते. दुपारी २.३० दरम्याने ते घरी येण्यासाठी निघाले असता समोरुन आलेल्या वाहनाने त्यांच्या मोटरसायकलला धडक दिल्यामुळे ते दोघेही खाली पडले. त्यांचा उजवा पाय तीन ठिकाणी फ्रॅक्चर झाला, तसेच त्यांच्या चेहऱ्यावर, खांदयावर जखम झाली तसेच त्यांचे बाबाना उजव्या पायावर गंभीर जखम झाली असल्याचे सांगितले आहे. तसेच त्यांनी पुढे आपल्या पुराव्यात पाठीमागून त्यांचा मामा संतोष

घाडी येवून त्यांना डॉ. पाकळे कणकवली यांचेकडे औषधोपचारसाठी नेले असे सांगितले आहे.

६. साक्षीदार क्र. ५ सुशांत पुरळकर हे तपासिक अंमलदार असून त्यांनी आपल्या पुराव्यात त्यांनी गुन्हा क्र. ४४/२०२३ चे तपासकामी घटनास्थळाचा पंचनामा करुन साक्षीदारांची तपास टिप्पणे नोंदवून जखमींचे वैद्यकिय प्रमाण्पत्रे प्राप्त केली व तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याचे सांगितले आहे. सा.क्र.५ तपासिक अंमलदार यांची साक्ष तांत्रिक स्वरुपाची असून प्रत्यक्ष अपघाताबाबत कोणताही प्रकाश टाकत नाही.

७. भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ आणि कलम मोटार वाहन अधिनियम १८४ अंतर्गत गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने आरोपीने त्याचे ताब्यातील मोटरसायकल क्र. एमएच–०४–जीएल–५५७२ ही निष्काळजीपणे, बेदरकारपणे व धोकादायक पध्दतीने चालवून स्वत:स व दत्ता वाळवे संग्राम यांना साध्या स्वरुपाची दुखापत आणि फिर्यादी व सा.क्र. ४ राहूल यांना यांस गंभीर स्वरुपाची दुखापत केली होती या बाबी सिध्द करणे आवश्यक आहेत. अभियोगपक्षाने उपरोक्त प्रमाणे सादर केलेल्या पुराव्यामध्ये घटनेच्या दिवशी, घटनेच्यावेळी व घटनास्थळी आरोपीच सदर मोटरसायकल चालवत होता असा कोणताही पुरावा आलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने उपरोक्त प्रमाणे सादर केलेल्या पुराव्यावरुन सदरील अपघात आरोपीने निष्काळजीपणे अथवा बेदरकारपणे वाहन चालवले होते असा दर्शविणारा कुठलाही पुरावा अभिलेखावरती आलेला नाही. घटनास्थळ पंचनामा हा घटनेनंतर २ दिवसांनी केलेला असून पंचनाम्याच्या वेळी घटनास्थळी अपघातग्रस्त वाहने बाजूला ठेवली असल्याचे पंच साक्षीदार यांनी सांगितले आहे. त्यामुळे अपघाताची सुस्पष्ट वस्तुस्थिती घटनास्थळ पंचनाम्यावरुन दिसून येत नाही. तसेच फिर्यादीने पंचनाम्याचेवेळी तो

घटनास्थळी हजर नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे नक्की अपघात कोठे झाला हे देखील घटनास्थळ पंचनाम्यावरुन दिसून येत नाही. ही बाब तपासिक अंमलदार यांनी आपल्या उलट तपासामध्ये मान्य केलेली आहे. सबब, सदर पंचनाम्यावरुन देखील अपघातामध्ये आरोपीची चुक होती असे दिसून येत नाही.

८. सा.क्र.३ संतोष हा अपघात घडल्यानंतर घटनास्थळी आल्याचे दिसून येते. त्यामुळे अपघाताबाबतची त्याची माहिती ही ऐकीव स्वरुपाची असून त्याची साक्ष अपघाताच्या घटनेबाबत विश्वासार्ह नाही. तसेच पंच साक्षीदार याने घटनास्थळी वळण नसल्याचे देखील सांगितले आहे. जरी बचाव पक्षाने फिर्यादी व साक्षीदाराचे वैद्यकिय प्रमाणपत्र मान्य केले असले तरी आरोपीने त्याचे ताब्यातील मोटरसायकल निष्काळजीपणे, बेदरकारपणे व धोकादायक पध्दतीने चालवून अपघात केला हे शाबीत झालेले नाही. फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी जखमी साक्षीदार यांनी आपल्या पुराव्यामध्ये आरोपी हा त्याची मोटरसायकल वेगाने व निष्काळजीपणे चालवत होता याबाबत एक शब्द देखील सांगितलेला नाही. तसेच फिर्यादी व जखमी साक्षीदार यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये घटनास्थळावर वळण असल्याने आरोपी हा त्याची मोटरसायकल चुकीच्या बाजूला येवून त्यांच्या मोटरसायकलला धडक दिली असे देखील सांगितलेले नाही. त्यामुळे अपघातामध्ये मोटरसायकलस्वार आरोपीची चुक व निष्काळजीपणा आहे हे शाबीत करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ आणि कलम १८४ मोटार वाहन अधिनियम अंतर्गत कुठलाही गुन्हा सिध्द होत नाही. त्या अनुषंगाने, मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**मुद्दा क्रमांक ५ व ६ बाबत –**

९. आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल ही विमा संरक्षीत न करता तसेच वायु प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र न काढता चालवून मोटर वाहन कायदा

कलम १९६ व कलम १९०(२) चे उल्लंघन केल्याचा दोषारोप ठेवण्यात आलेला आहे. परंतु तपासिक अंमलदार यांनी आरोपीस मोटरवाहन कायद्याप्रमाणे किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ९१ अन्वये नोटीस देवून आरोपीकडून मोटरसायकलचे विमा प्रमाणपत्र अथवा वायु प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र मागितले व ते आरोपीने हजर केले नाही याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच त्याबाबत देखील तपासिक अंमलदार यांनी आपल्या पुराव्यात काहीही सांगितलेले नाही. त्यामुळे आरोपीने त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही विमा संरक्षीत न करता, वायु प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र न बाळगता चालविली हे शाबीत होत नाही. सबब, मी मुद्दा क्र. ५ व ६ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे व मुद्दा क्र. ७ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | आरोपी राजेश दशरथ वाळवे याची फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड विधान कलम २७९,३३७,३३८ व मोटर वाहन कायदा कलम १८४, १९६/१४६, १९०(२) या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचे व जामीनदाराचे जामीन व जात मुचलके रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीने कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार माननीय अपिलार्थी न्यायालयाने नोटीस निर्गमीत करुन हजर राहण्यास आदेशीत केल्यास अपिलार्थी न्यायालयासमक्ष हजर राहण्याबाबत १५,०००/– रुपयाचा वैयक्तिक बंधपत्र व सदर रकमेची जामीन द्यावी. |
| | (खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय अधिघोषित.) |

सही/–
एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग १, मालवण

ठिकाण : मालवण
दिनांक : ०८/०५/२०२६